१९३१ ते १९५५ हा कालखंड मराठी रंगभूमीला वाईट काळ होता. परंतु ह्याही काळात कृ. बा. भोसले नावाचे एक नाटककार नाटके लिहितच होते. नागपूरचे नाना जोग, मलकापूरचे पु. भा. भावे ह्यांचीही नाटके त्यावेळी प्रसिध्द होती. भावे नाट्यसंमेलनाचे अध्यक्षही होते. बाळ शास्त्री वाशीमकर ह्यांनी बालगंधर्वांच्याच काळात 'संगीत सौभद्र' हे नाटक मुंबईपर्यंत नेऊन त्याचे प्रयोग केले. २८ ऑगस्ट १९०५ रोजी मुंबई येथे झालेल्या पहिल्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष कै. दादासाहेब खापर्डे होते. तसेच अनंत वामन बर्वे यांनी त्याकाळी विस्कळीत झालेल्या मराठी रंगभूमीला वाट दाखविण्यासाठी संमेलनाची कल्पना मांडली. दादासाहेब खापर्डेनी ती उचलून धरली नि काही तज्ञ व्यक्तींनी मिळून 'अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदे'ची स्थापना केली. ह्यात दादासाहेब खापर्डेंचा महत्वपूर्ण वाटा होता. दादासाहेब खापर्डे, मोरोपंत जोशी, वीर वामनराव जोशी, नानासाहेब बामणगावकर, तात्यासाहेब मुधोळकर आणि पुरुषोत्तम दारव्हेकर ही नाट्य संमेलानाध्यक्षपदी त्याकाळी विराजमान झालेली मंडळी होत.

लोककलेचे अभ्यासक डॉ. मधुकर वाकोडे, व-हाडी भाषेत नाटके का होत नाहीत ? असा सवाल करणारे डॉ. विठ्ठल वाघ विदर्भाचेच. कारण त्यांचे मते या भाषेतील नागपूरी व-हाडीतील 'व-हाडी माणसं', उद्धवजी शेळके ह्यांच्या कादंबरीवर आधारित 'पोहा चालला महादेवा' आणि विठ्ठल वाघांचे 'अंधार यात्रा' ही तीनच नाटके झाल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे. ह्याशिवाय आणखीही काही नाटके झाली असतील.

एकांकिका ह्या नाट्यप्रकारात विश्वविख्यात नाटककार प्रा. महेश एलकुंचवार हे नाव हटकून घेतले जाते. त्यांच्या एकांकिका विजया मेहता सारख्या दिग्दर्शिकेने बसविल्या नि अनेक आव्हानात्मक समस्या आपल्या नाटकाद्वारे समाजासमोर मांडल्या. ती नाटके प्रसिद्धही झालीत नि प्रेक्षकांना भावलीसुध्दा, एलकुंचवारही नागपूरचेच, विद्याधर गोखले तर मूळ अमरावतीचेच, त्यांच्या